**श्री भैय्याजी पांढरीपांडे**
**नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वर्क**
**हनुमान नगर, नागपूर**

# राष्ट्रीय सेवा योजना
# नियमित कार्यक्रम अहवाल

डॉ. एल.एस.तुळणकर
प्राचार्य

डॉ. विलास घोडे
कार्यक्रम अधिकारी

**२०१६–२०१७**

# <u>बी. पी. नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ सोशल वर्क,</u>
# <u>हनुमान नगर, नागपूर–9</u>
## *<u>राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम अहवाल (2016–17)</u>*

बी. पी. नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ सोशल वर्क मधील राष्ट्रीय सेवा योजना पथका अंतर्गत या शैक्षणिक सत्रामध्ये एकूण स्वयंसेवक सहभागी असून यामध्ये मुले व मुलींचा समावेश आहे. राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या निर्देशनुसार महाविद्यालयामध्ये विविध उपक्रम आणि कार्यक्रम राबविण्यात आले.

दि. १ जुलै, २०१६ ला राष्ट्रीय सेवा योजना पथकाकडून महाविद्यालयामध्ये वृक्षरोपण आणि वृक्षसंवर्धन कार्यक्रम राबविण्यात आला. यामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुळणकर, डॉ. बरडे, डॉ. बारहाते, डॉ. घोडे काही महाविद्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

दि. ८ जुलै, २०१६ ला राष्ट्रीय सेवा योजना पथकातील स्वयंसेवकांची निवड करण्यात आली तसचे स्वयंसेवकांचे पंजीकरण करण्यात आले.

दि. २४ जुलै २०१६ ला 'या जिवानाच काय करू' या विषयावर ज्येष्ठ समाजसेवक आणि सर्च चे संस्थापक डॉ. अभय बंग यांचे व्याख्यान महाविद्यालयात आयोजित करण्यात आले. यामध्ये महाविद्यालयातील प्राचार्य शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व मान्यवर उपस्थित होते.

दि. १२ ऑगस्ट २०१६ ला 'स्वच्छ भारत अभियान अंतर्गत चिटणीस नगर, धन्वतरीनगर आणि आदर्शनगर येथे स्वच्छता जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या स्वच्छता जनजागृती रॅलीचे उद्घाटन नगरसेवक श्री किशोर कुमेरिया, श्री. रतनजी कुमेरिया आणि स्वच्छता निरीक्षण मनपा नागपूर यांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे ८० स्वयंसेवक आणि कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले होते.

दि. १३ ऑगस्ट २०१६ ला 'अवयवदान' रॅली महाविद्यालयातील ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या रॅलीत मातृ सेवा संघ आणि एल ऐ. डी महाविद्यालयामध्ये समायोजन करण्यात आले

दि. २१ ऑगस्ट २०१६ ला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील विद्यार्थी कल्याण मंडळ आणि राष्ट्रीय सेवा योजनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय समाजप्रबोधन कार्यक्रम देशपांडे सभागृह येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील ३२ विद्यार्थी सहभागी झाले होते.

दि. २४ ते २८ ऑगस्ट २०१६ या कालावधीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे प्रेरणा–२०१६ राज्यस्तरीय नेतृत्व प्रशिक्षण शिबीर सुभेदार सभागृह येथे आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षण शिबीरामध्ये महाविद्यालयातील कु. आरती झामरकर आणि श्री देविदास इबीतवार या दोन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तसेच महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विलास घोडे यांनी या शिबीरामध्ये व्यवस्थापन समितीचे कार्य केले.

दि. २७ ऑगस्ट २०१६ ला दुपारी १२.३० वा महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय युवा संघटनद्वारा सामाजिक समस्यांवर आधारीत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. सफाई कमगारांच्या समस्येवर, सामाजिक स्थितीवर विद्यार्थ्यांना प्रबोधन करण्यात आली.

दि. ३० ऑगस्ट २०१६ ला सकाळी ८.३० वा. आरोग्य विभाग (महाराष्ट्र शासन) आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्याद्वारा आयोजित अवयव दान रॅलीमध्ये महाविद्यालयातील २० विद्यार्थी व कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले ही रॅली कस्तुरचंदपार्क ते व्हरायटी चौक येथे पर्यंत आयोजित करण्यात आले.

दि. ३० ऑगस्ट २०१६ ला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील दिक्षांत सभागृह येथे पाणी फाउंडेशन संस्थेद्वारा आयोजित कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील १५ विद्यार्थी सहभाग झाले.

दि. २९ सप्टेंबर २०१६ ला लोकप्रशासन विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्याद्वारा आयोजित राष्ट्रीय कार्यशाळेमध्ये महाविद्यालयातील ४० विद्यार्थी सहभागी झाले.

दि. ३० सप्टेंबर २०१६ ला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाद्वारा आंबेडकर नगर, वाडी येथे स्वच्छता रॅली आणि पथनाटय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या रॅलीचे उद्घाटन नगरसेवक श्री आशिष नंदागवळी यांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालयातील ४० स्वयंसेवक विद्यार्थी आणि समुदयातील नागरिक मोठया प्रमाणात कार्यक्रमामध्ये सहभागी झाले होते.

दि. २ ऑक्टोंबर २०१६ सकाळी ८.३० वा. महात्मा गांधी जयंती निमित्याने स्वच्छ भारत अभियान द्वारा 'ग्राम बहादुरा' येथे स्वच्छता रॅली आणि पथनाटय कार्यक्रम आयोजित करण्यात आला. महात्मा गांधी जयंती निमित्याने प्राथमिक शाळा बहादुरा येथील प्रागंणामध्ये महात्मा गांधी जयंतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महात्मा गांधीच्या प्रतिमेला श्री नरेंद्रजी नांदुरकर (सरपंच, बहादुरा) श्री. नरेंद्रजी आंबटकर, अध्यक्ष (शाळा समिती), श्री सव्वालाखे (मुख्याध्यापक), डॉ. नंदा पांगुळ, डॉ. विलास घोडे यांनी माल्यार्पण आणि पुष्पांजली अर्पण केली. पाहुण्यांनी महात्मा गांधीच्या कार्यकर्तृत्त्वावर प्रकाश टाकला. त्यानंतर गावामध्ये रॅली आणि पथनाटयांचे आयोजन करण्यात आले यामध्ये शाळेतील मुले, गावातील युवक आणि ५० स्वयंसेवक मोठया प्रमाणात उपस्थित होते.

दि.३ ऑक्टोंबर २०१६ सकाळी १०.०० वा. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे माहात्मा गांधी जयंती निमित्याने स्वच्छता आणि व्यसनमुक्ती रॅली व पथनाटयाचे आयोजन करण्यात आले.

दि. ८ ऑक्टोंबर २०१६ ला सकाळी १०.०० वा. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन रिपब्लिकन नगर, इदोरा येथे करण्यात आले. या शिबीराकरीता महात्मे रूग्णालय येथील डॉक्टरांच्या सहकार्याने शिबीर आयोजित करण्यात आले सममुदायातील १३० नागरिकांनी या शिबीराचा लाभ घेतला.

दि. १८ ते २० ऑक्टोंबर २०१६ ला अति विशेषोपचार आणि रासेयो पथक यांच्या संयुक्त विद्यमानाने ‘रक्तदान’ जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयात रांगोळी स्पर्धा, भिंती चित्र स्पर्धा, स्लोगण स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेतील उत्कृष्ट स्पर्धकांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक देण्यात आले.

दि. २० ऑक्टोंबर २०१६ ला सकाळी ८.३० वा रक्तदान जनजागृती कार्यक्रमासाठी सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले यामध्ये महाविद्यालयातील २५ विद्यार्थ्यांनी रक्तदानाचा संदेश देणारे टिशर्ट घालून रॅलीचे आयोजन करण्यात आले.

दि. २१ ऑक्टोंबर २०१६ ला सकाळी ८.०० वा राष्ट्रीय एकात्मता दिनाच्या निमित्याने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे आयोजित रॅलीमध्ये महाविद्यालयातील १६ स्वयंसेवक सहभागी झाले होते.

दि. २६ नोव्हेंबर २०१६ ला सकाळी ८.०० वा संविधान दिनाच्या निमित्याने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे आयोजित रॅलीमध्ये महाविद्यालयातील २२ विद्यार्थी सहभागी झाले होते.

दि. १ डिसेंबर २०१६ ला सकाळी ८.३०वा जागतिक HIV/एड्स दिनानिमित्याने सावित्रीबाई फुले येथे एड्स जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील ५५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

दि. ५ डिसेंबर २०१६ ला दूपारी २.०० वा. जागतिक एड्स दिनानिमित्याने HIV/AIDS प्रतिबंधनात्मक जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमांमध्ये डॉ. भुसेंडी, श्री. मिलिंद शेंडे या वक्त्यांनी HIV/AIDS ची जागतिक स्थिती, लक्षणे, कारणे आणि सामाजिक दृष्परिणाम इत्यादी मुद्यांवर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले आणि संबंधी असलेल्या गैरसमजुती संबंधी चर्चा केली.

दि. ६ डिसेंबर २०१६ ला दूपारी १२.०० वा. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६१ महापरिनिर्वाण दिनानिमित्याने रासेयो पथकद्वारे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दि. ७ जानेवारी २०१७ ला सकाळी ८.३० वा. पोलिस रेजिंग डे निमित्याने रॅलीचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील २१ विद्यार्थी या रॅलीमध्ये सहभागी झाले होते.

दि. १६ जानेवारी २०१७ ते २१ जानेवारी २०१७ या कालावधी राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष ग्रामीण शिबिर मोहाडी येथे आयोजित करण्यात आले. या शिबीरामध्ये विविध उपक्रम व कार्यक्रम राबविण्यात आले.

दि. २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०१७ या कालावधीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि कमला नेहरू महाविद्यालय, सक्करदरा यांच्या संयुक्त विद्यामानाने जलयुक्त शिवाराकरिता युवकांचे योगदान या संकल्पनेवर आधारित विद्यापीठस्तरीय शिबिरामध्ये महाविद्यालयाचे ५ विद्यार्थी संजीवन वृद्धाश्रम, आमगाव देवळी येथे सहभागी झाले होते.

दि. २९ जानेवारी ते ४ फेब्रुवारी २०१७ या कालावधीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि राणी इंदिराबाई भोसले महाविद्यालय, कुही यांच्या संयुक्त विद्यमानाने सर्वांगीण ग्राम स्वच्छता अभियानास्तव युवाशक्ती या संकल्पनेवर आधारित विशेष राज्यस्तरीय श्रमसरकार शिबीरामध्ये महाविद्यालयाचे ८ विद्यार्थी कुही येथे सहभागी झाले होते.

दि. २६ फेब्रुवारी ते १२ मार्च २०१७ या कालावधी क्रिडा व युवक सेवा संचालनालय पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय नागपरू (महाराष्ट्र शासन) यांच्या द्वारा आयोजित युवानेतृत्व व व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण शिबीर विभागीय क्रिडा संकुल, मानकापूर कोराडी रोड नागपूर येथे ६ विद्यार्थी शिबीरामध्ये सहभागी झाले.

दि. ८ मार्च २०१७ ला सकाळी ८.३० वा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ रासेयो विभाग यांच्यावतीने 'ग्रंथ दिडी' आयोजित करण्यात आली. या ग्रंथ दिडी कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील १८ विद्यार्थी सहभागी झाले होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम समन्वयक डॅ. भाऊ दायदार, श्री ताराचंदजी चव्हान, श्री. प्रकाश शुक्ला, सौ. बान्ते मॅडम यांनी दिलेले मार्गदर्शन व सहार्याबद्दल आम्ही आभारी आहोत.

| | |
|---|---|
| डॉ. विलास घोडे | डॉ. एल.एस. तुळणकर |
| कार्यक्रम अधिकारी | प्राचार्य |
| रा.से.यो पथक | |




स्व.ईश्वरबाबू देशमुख यांचे स्मृतिदिनानिमित्य
रक्तदान
B.P. NATIONAL INSTITUTE OF SOCIAL WORK
Hanuman Nagar, Nagpur-09
राष्ट्रीय सेवा योजना
NATIONAL SERVICE SCHEME


B.P. NATIONAL INSTITUTE OF SOCIAL WORK
Hanuman Nagar, Nagpur-09
राष्ट्रीय सेवा योजना
NATIONAL SERVICE SCHEME
NATIONAL SERVICE SCHEME